**सन २०१६-२०१७ चा सुधारित आणि सन २०१७-२०१८ चा मूळ अर्थसंकल्प "अ", "क" आणि "पी" यावरील स्थायी समिती, सभापती यांचे निवेदन**

सन्मा. महापौर, सन्मा. उपमहापौर, सर्व सन्मा. सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग आणि उपस्थित पत्रकार आणि प्रेक्षक.

आदरणीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करुन मी अर्थसंकल्पाविषयी निवेदन सादर करीत आहे. मा. आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी जमा खर्चाचे सन २०१६-२०१७ चे सुधारित आणि सन २०१७-२०१८ चे मूळ अंदाजपत्रक स्थायी समितीच्या दि. १६ फेब्रुवारी २०१७ रोजीच्या सभेमध्ये सादर केले होते. त्याचप्रमाणे परिवहन उपक्रमाचा सन २०१६-२०१७ चा सुधारित आणि सन २०१७-२०१८ चा मूळ अर्थसंकल्प तसेच वृक्ष प्राधिकरणाचा सन २०१६-२०१७ चा सुधारित आणि सन २०१७-२०१८ चा मुळ अर्थसंकल्प स्थायी समितीच्या अर्थसंकल्पविषयक विशेष सभेपुढे सादर करण्यात आले. सन २०१६-२०१७ चे सुधारित आणि सन २०१७-२०१८ चा मूळ अंदाजपत्रक "अ", "क", परिवहन उपक्रमाचा अर्थसंकल्प "ब" तसेच वृक्ष प्राधिकरणाच्या अर्थसंकल्पावर विचार करण्यासाठी दिनांक २७, २८ फेब्रुवारी २०१७ आणि दिनांक ०२ मार्च २०१७ रोजी स्थायी समितीची अर्थसंकल्पविषयक विशेष सभा घेण्यात आली.

**सन २०१६-२०१७ चे जमा व खर्चाचे सुधारित अंदाजपत्रक "अ", "क" आणि "पी":-**

आयुक्तांनी सन २०१६-२०१७ चे सुधारित अंदाजपत्रक "अ", "क" आणि "पी" सादर करताना, आरंभीची शिल्लक रुपये २९१ कोटी १० लाख २७ हजार जमेस धरुन, सुधारित उत्पन्न (महसूली व भांडवली) रुपये २२९५ कोटी १९ लाख १७ हजार इतके दर्शविले आहे. तसेच सन २०१६-२०१७ करीता सुधारित महसुली आणि भांडवली खर्च रुपये १९३९ कोटी ५३ लाख ५२ हजार इतका दर्शविण्यात आला आहे आणि सन २०१६-२०१७ या वर्षासाठी अखेरची शिल्लक रुपये ३५५ कोटी ६५ लाख ६५ हजार इतकी नमूद केली आहे.

**<u>सन २०१७-२०१८ चे जमा व खर्चाचे मूळ अंदाजपत्रक "अ", "क" आणि "पी":-</u>**

आयुक्तांनी सन २०१७-२०१८ चे मूळ अंदाजपत्रक "अ", "क" आणि "पी" सादर करताना आरंभीची शिल्लक रुपये ३५५ कोटी ६५ लाख ६५ हजार सह एकूण उत्पन्न रुपये २९९९ कोटी ४७ लाख ९० हजार इतकी दर्शविली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेला मोरबे धरणामुळे लाभलेली जलसंपन्नता, घनकचरा व्यवस्थापनाची पर्यावरणशील आधुनिक प्रणाली, सांडपाणी शुद्ध करणारी अत्याधुनिक मलप्रक्रिया केंद्रे, आकर्षक उद्याने, प्रशस्त रस्ते अशा अनेक गोष्टींमुळे व अत्याधुनिक स्मार्ट प्रकल्पांमुळे आधुनिक शहर म्हणून गेले अनेक वर्षापासून नावाजले आहे. आपले नवी मुंबई शहर आता अधिक स्मार्ट होण्याच्या दिशेने गतीमान वाटचाल करीत आहे. यामध्ये शहरातील नागरिकांचे, लोकप्रतिनिधींचे, महापालिका अधिकारी, कर्मचारी व पत्रकार यांचे फार मोठे सहकार्य आहे.

नवी मुंबई महानगरपालिके अंतर्गत स्थानिक संस्था कर, मालमत्ता कर, पाणीपट्टी व नगररचना विकास शुल्क हे उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहेत. वाढती लोकसंख्या आणि आवश्यक असणा-या नागरी सुविधा यांच्या पुर्ततेसाठी जमा आणि खर्चाची सांगड घालणे तसेच उत्पन्नाचा अपेक्षित इष्टांक गाठणेसाठी या सभागृहाच्या दिशा-निर्देशानुसार वेळोवेळी प्रयत्नांची पराकाष्ठा करणे आवश्यक आहे.

महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांची नोंद राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांच्या माध्यमातून घेतली गेली आहे. महानगरपालिकेला गेल्या अनेक वर्षात आजवर लाभलेले विविध राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय सन्मान/पुरस्कार यामध्ये अधिकारी-कर्मचारी यांच्यासह नवी मुंबईतील नागरिकांचाही मोलाचा वाटा आहे. स्वच्छतेविषयीच्या सुनियोजित कार्यवाहीसाठी "स्वच्छ महाराष्ट्र अभियान प्रकल्प अंमलबजावणी कक्ष" महानगरपालिकेमध्ये स्थापन करण्यात आलेला असून नागरिकांच्या सक्रीय सहभागाने स्वच्छतेविषयी एक जागरुक चळवळ शहरात उभी राहताना दिसत आहे. याचा उपयोग निश्चितच शहर स्वच्छता पर्यायाने आरोग्यासाठी होईल.

नागरिकांना आरोग्यविषयक सेवा सुविधा पुर्ततेसाठी नेरुळ, ऐरोली, व बेलापूर येथील रुग्णालये पूर्ण क्षमतेने लवकरच कार्यान्वित होत आहेत. शहराचा नावलौकीक वाढेल असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारकही लवकरच पूर्णत्वास येईल.

सदर अर्थसंकल्पाचा विचार केला असता, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सक्षम असल्याचे दिसून येत आहे. जनतेच्या पैशांचा योग्य प्रकारे वापर होत असल्याने नागरिकांना विविध नागरी सुविधा पुरविण्यामध्ये कोणत्याही प्रकारची कधीही अडचण निर्माण होणार नाही. हा दृष्टीकोन समोर ठेवून नगरसेवकांनी केलेल्या सूचनांचा आदर करुन त्यांनी सूचविलेल्या सर्व कामांकरीता अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली यामधून नगरसेवकांची हक्कांची जाणीव ठेवल्याबद्दल मला समाधान वाटत आहे. आणि म्हणूनच आजवर नगरसेवक प्रभागाच्या निधीच्या अनुषंगातून आजवरच्या अर्थसंकल्पामध्ये प्रामुख्याने उल्लेख नव्हता परंतु या अर्थसंकल्पामध्ये तसे लेखाशिर्ष निर्माण केले आहे. कामांची मोठी साखळी विभागानुसार घेऊन कामांमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्यामुळे विभागानुसार कामे न घेता प्रभागातील कामांना कुठलीही अडचण येऊ नये म्हणून प्रभागनिहाय कामे करण्याची रचना लक्षात ठेवून प्रभाग निहाय कामे करण्याची पध्दत सोपी ठरत आहे. ही बाब विचारात घेणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने याबाबत स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन, पुढील सरकारी वर्षात कलम १२७, पोट-कलम(१) मध्ये निर्दिष्ट केलेले नगरपालिका कर ज्या दराने बसविण्यात येतील ते दर आणि उक्त कलमाच्या पोट-कलम(२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या करांपैकी जे कोणतेही कर ( त्याच्या खंड (अअअ) स्थानिक संस्था कर वगळून ) बसवण्याचे तिने ठरवले असेल तर ते कर पुढील सरकारी वर्षात ज्या दरांनी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा, प्रकरण ११ मध्ये विहीत केलेल्या मर्यादास व शर्तीस अधीन राहून, फेब्रुवारी महिन्याच्या २० तारखेला किंवा त्यापूर्वी महानगरपालिकेने दर निश्चित केले पाहिजेत. अशी तरतूद असताना त्याचे पालन न करता, जनतेवर कर लादणे हे उचित

ठरणार नाही. असे असताना मा. आयुक्तांनी उत्पन्न आणि खर्चाचे अंदाज मा. स्थायी समितीला सादर करताना विवरणपत्रात करवाढ सूचित करण्यात आलेली होती. परंतु स्थायी समितीने करवाढ तरतूदीची सूचना, नियमाला धरुन नाही, ही बाब लक्षात घेऊन व महासभेच्या अधिकाराची जाणीव ठेवून होणारी करवाढ रद्द करुन सदर करांमध्ये कोणतीही वाढ न करता सर्वसामान्य जनतेला दिलासा वाटेल या शुध्द हेतूने सन २०१६-२०१७ चेच दर निश्चित करण्यात आलेले आहेत.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील युवक कल्याण, क्रिडा व सांस्कृतिक यासाठी तसेच महिला सक्षमीकरण व ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी अर्थसंकल्पामध्ये विशेष तरतूद केली आहे.

**मा. आयुक्तांनी सादर केलेल्या सन २०१७-२०१८ चे मूळ अंदाजपत्रकात मा.स्थायी समितीने सुचविलेली जमेची वाढ(+)/घट(-)** (रुपये लाखात)

| अ. क्र. | जमा तपशिल | आयुक्तांचे अंदाज | मा. स्थायी समितीने सुचविलेली | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ(+) | घट(-) | |
| १. | मालमत्ता कर (एकत्रित) | ८२५००.०० | - | -१५००.०० | ८१०००.०० |
| २. | नगररचना वसुली(एकत्रित) | ११५००.०० | - | -२०००.०० | ९५००.०० |
| ३. | जाहिरात शुल्क | २२३०.०० | १००.०० | - | २३३०.०० |
| ४. | रस्ते खुदाई शुल्क | ३४७५.०० | ५२५.०० | - | ४०००.०० |
| ५. | पाणीपट्टी वसुली (एकत्रित) | १३४७६.०० | - | -३९७६.०० | ९५००.०० |
| ६. | मोरबे धरण शुल्क-महाराष्ट्र जीवन प्राधिकरण | ०.०० | ३३३.०० | - | ३३३.०० |
| | एकूण जमा **वाढ(+)/घट(-)** | | **९५८.००** | **-७४७६.००** | **-६५१८.००** |

| तपशिल | मा. आयुक्तांनी प्रस्तावित केलेले अंदाज | मा. स्थायी समितीने सुचविलेली वाढ(+)/घट(-) | मा. स्थायी समितीचा अंदाज |
|---|---|---|---|
| **आरंभीच्या शिल्लकेसह अंदाजपत्रकीय जमा** | **२९९९४७.९०** | **-६५१८.००** | **२९३४२९.९०** |

**<u>मालमत्ता कर</u>** :- मालमत्ता कराच्या माध्यमातून मिळणारे उत्पन्न हा देखील एक महत्वाचा आर्थिक स्त्रोत आहे. मालमत्ता कर विभागप्रमुख यांनी आपल्या सहका-यांसह चांगल्या प्रकारचे काम करीत मालमत्ता विभागाला दिलेले उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षासाठी निश्चित करण्यात आलेले मालमत्ता कराचे दर सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी लागू करण्यात यावेत. सन २०१७-२०१८ च्या मा. आयुक्तांच्या जमा-खर्च अंदाजपत्रकामध्ये आयुक्तांनी नवीन हेड घनकचरा व्यवस्थापन कर लावलेले आहे. त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९९ प्रमाणे माहे फेब्रुवारीच्या २० तारखेपूर्वी महासभेमध्ये मंजूरी घेणे आवश्यक आहे ती मंजूरी घेतली नाही. तसेच जमा खर्चाचे अंदाजपत्रक सादर करणेपूर्वी मालमत्ता कराचे दर मंजूर केले नाही. म्हणून सन २०१७-२०१८ मध्ये जी वाढ केली आहे ही कमी करण्यात येत आहे. तसेच ज्या पध्दतीने मालमत्ता कर विभागाने ज्या योजना केलेल्या आहेत त्या योजनेनुसार व काही थकीत मालमत्ता कर आहेत ही बाब लक्षात घेता प्रशासनाने धरलेल्या रुपये ८२५ कोटी मधून घनकचरा व्यवस्थापन कराचे रुपये २६.८९ कोटी वाढीव कर वगळून रुपये ७९८.१० कोटी होत आहे. त्यामध्ये रुपये ११.९० कोटीची स्थायी समितीच्या माध्यमातून वाढ सूचविण्यात येत असून रुपये ८१० कोटीचे इष्टांक गाठण्यात यावा असे मी सूचित करु इच्छितो. त्याचबरोबर वृत्तपत्रामध्ये गाजलेल्या मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेच्या वसुलीच्या अनुषंगातून मा. आयुक्तांनी व्यक्तीश: लक्ष द्यावे असे सुचित करतो.

**<u>नगररचना विभाग</u>** :- आयुक्तांनी सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकामध्ये १) विकास आकार, २) तडजोड शुल्क, ३) चटईक्षेत्रमुक्त क्षेत्रासाठी अधिमूल्य हे नमूद केले आहे. कोणतेही दर ठरवताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९९ प्रमाणे अंदाज जमाखर्च सादर करण्यापूर्वी स्थायी समिती, महासभेमध्ये मंजूर करावयाचे असतात. परंतु त्या दरास मंजूरी न घेता जमाखर्चामध्ये जमेच्या बाजूमध्ये जमा दाखविलेली आहे ती कमी करण्यात आली आहे.

मा. आयुक्तांच्या मनोगतात पुर्नविकास तसेच घणसोली नोड व गावठाण विकास या बाबी संभाव्य मंजूर होणार आहेत ही बाब लक्षात घेता प्रशासनातर्फे सुचविण्यात आलेली दरवाढ गृहीत न धरता नगररचना विभागासाठी सन २०१६-२०१७ च्या रुपये २३.२६ कोटीच्या तुलनेत सन २०१७-२०१८ मध्ये रुपये ९५ कोटीचा इष्टांक देण्यात येत आहे. महानगरपालिकेचा विकास आराखडा वेळेवर तयार झाला असता तर गाव गावठाण यांना दिलासा मिळाला असता व महानगरपालिकेला आता होणारा त्रास झाला नसता. त्यामुळे मी असे सुचित करतो की नगररचना विभागाने विकास आराखडा लवकरात लवकर तयार करावा.

**जाहिरात शुल्क** :- सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकामध्ये जाहिरात शुल्काकरीता प्रशासनाने २२ कोटी ३० लक्ष इतके अंदाज केलेले आहेत. लवकरच जाहिरात धोरण अंमलात येणार आहे. नवी मुंबईचा झपाट्याने होणारा विकास व भविष्यातील प्रस्तावित विमानतळ या सर्व बाबी लक्षात घेता जाहिरात शुल्कामध्ये रुपये १ कोटीची स्थायी समितीच्या माध्यमातून वाढ सूचविण्यात येत आहे. असे एकूण रुपये २३ कोटी ३० लाख हे इष्टांक देण्यात येत आहे.

**रस्ते खोदाई शुल्क** :- महानगरपालिका कार्यक्षेत्रातील रस्ते चांगले केल्यानंतर पुन्हा विविध संस्थांकडून विविध कारणांसाठी खोदले जातात. त्यासाठी महानगरपालिका शुल्क आकारणी करीत असते. नव्याने निर्माण होणारा घणसोली नोड व भविष्यात आधुनिक टेक्नोलॉजी नवी मुंबईत येणार आहे. त्यासाठी रस्ते खोदाई शुल्कामध्ये जमेमध्ये रुपये ५.२५ कोटीची स्थायी समितीच्या माध्यमातून वाढ सूचविण्यात येत आहे व एकूण रुपये ४० कोटी हे उद्दीष्ट देण्यात येत आहे.

**<u>पाणी पुरवठा</u>** :- सन २०१७-२०१८ च्या जमाखर्च अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्तांनी पाणी दर मंजूरी गृहीत धरलेली आहे. कोणतेही दर ठरवताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ९९ प्रमाणे अंदाज जमाखर्च सादर करण्यापूर्वी स्थायी समिती, महासभेमध्ये मंजूर करावयाचे असतात. परंतु तशी मान्यता घेतलेली नसून मा. आयुक्तांनी जमेच्या बाजूने रुपये १३४.७६ कोटी अंदाजित धरलेले आहेत. ते जमाखर्चाच्या अंदाजपत्रकामधून वगळण्यात आलेले आहेत.

सन २०१६-२०१७ चे पाण्याचे दर हे कायम करुन जमा मध्ये पकडण्यात यावेत. पाण्याची थकबाकी व नवीन पाणी कनेक्शन गृहीत धरता सन २०१६-२०१७ मध्ये येणारे एकूण रुपये ७१.०४ कोटी उत्पन्न यामध्ये सन २०१७-२०१८ मध्ये रुपये २३.९६ कोटीची वाढ स्थायी समितीच्या माध्यमातून सूचविण्यात येत आहे. असे सन २०१७-२०१८ साठी एकूण रुपये ९५ कोटी हे उद्दीष्ट देण्यात येत आहे. हे साध्य होण्याकरीता मागेल त्याला नळजोडणी उपलब्ध केल्यास व पाणी गळतीवर उपाययोजना आणि वसुलीवर अधिक लक्ष दिले तर महापालिका तिजोरीत जादा महसूल गोळा होण्यास मदत होईल.

**<u>मोरबे धरण शुल्क-महाराष्ट्र जीवन प्राधिकरण</u>** :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून सन २०१७-२०१८ च्या जमाखर्च अंदाजपत्रकामध्ये मा. आयुक्तांनी मोरबे धरण शुल्क रुपये ०.०० गृहीत धरले आहे. त्यामध्ये सन २०१७-२०१८ मध्ये रुपये ३.३३ कोटीची वाढ स्थायी समितीच्या माध्यमातून सूचविण्यात येत आहे.

मा. आयुक्तांनी सादर केलेल्या सन २०१७-२०१८ च्या मूळ अंदाजपत्रकात मा.स्थायी समितीने सुचविलेली खर्चाची वाढ (+)/घट(-)

(रुपये लाखात)

| अ.क्र | खर्चाचा तपशिल | आयुक्तांचे अंदाज | मा. स्थायी समितीने सुचविलेली | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ(+) | घट (-) | |
| १. | अनधिकृत बांधकामे हटविणे खर्च | ३००.०० | - | -१००.०० | २००.०० |
| २. | डेब्रीज विरोधी भरारी पथक | १५०.०० | - | -२५.०० | १२५.०० |
| ३. | फेरीवाला धोरण अंमलबजावणी | ५५.०० | - | -२५.०० | ३०.०० |
| ४. | जाहिरात धोरण (जाहीरात माध्यमे होर्डींग उभारणी करणे/प्रवेशद्वारासह) | २६२.०० | १००.०० | - | ३६२.०० |
| ५. | नवीन पुल बांधणे | २०२०.०० | - | -१०००.०० | १०२०.०० |
| ६. | स्ट्रीट फर्निचर देखभाल दुरुस्ती | ६७.३९ | ३३.०० | - | १००.३९ |
| ७. | अपारंपारिक उर्जा स्त्रोत | १.०० | ९९.०० | - | १००.०० |
| ८. | पे ॲण्ड पार्क | ३५१९.५४ | - | -१०००.०० | २५१९.५४ |
| ९. | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक | १८००.०० | ७००.०० | - | २५००.०० |
| १०. | प्रवेशद्वार गाव-गावठाण(वाशी/ऐरोली/दिघा/शिळफाटा/बेलापूर ) | ०.०१ | ५००.०० | - | ५००.०१ |
| ११. | कृत्रिम चौपाटी विकसित करणे | १०००.०० | - | -५००.०० | ५००.०० |
| १२. | सी.सी.टी.व्हि. सर्व्हेलंस | १५०००.०० | - | -२५००.०० | १२५००.०० |
| १३. | आदीवासी घरे बांधणे | ४०००.०० | - | -२०००.०० | २०००.०० |
| १४. | महापालिका शाळा इमारतींमध्ये Fire Extinguisher लावणे | १३३३.५२ | - | -६००.०० | ७३३.५२ |
| १५. | रस्ते, फुटपाथ, गटारे बांधणे | १२३८.०७ | - | -२००.०० | १०३८.०७ |
| | **एकूण खर्च वाढ(+)/घट(-)** | | **१४३२.००** | **-७९५०.००** | **-६५१८.००** |

| तपशिल | मा. आयुक्तांनी प्रस्तावित केलेले अंदाज | मा. स्थायी समितीने सुचविलेली वाढ(+)/घट(-) | मा. स्थायी समितीचा अंदाज |
|---|---|---|---|
| **अंदाजपत्रकीय खर्च** | **२९९८४८.९०** | **-६५१८.००** | **२९३३३०.९०** |
| **अखेरची शिल्लक** | **९९.००** | | **९९.००** |
| **अखेरच्या शिल्लकेसह अंदाजपत्रकीय खर्च** | **२९९९४७.९०** | **-६५१८.००** | **२९३४२९.९०** |

## अनधिकृत बांधकामे हटविणे खर्च :-

खर्चाच्या बाजुचा विचार करता अनधिकृत बांधकामे डेब्रिज हटविणे या हेडमध्ये स्थायी समितीच्या माध्यमातून सन २०१७-१८ अंदाजपत्रकामध्ये रुपये २ कोटी तरतूद करण्यात येत आहे.

## डेब्रिज विरोधी भरारी पथक :-

सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकामध्ये जी खर्चाची तरतूद केलेली होती त्यामध्ये स्थायी समितीच्या माध्यमातून रुपये १२५ लाख तरतूद करण्यात येत आहे.

## जाहीरात धोरण (जाहिरात माध्यमे होर्डींग उभारणी करणे/प्रवेशद्वारासह) :-

भांडवली खर्चामध्ये आयुक्तांनी रुपये २६२ लाख हे अंदाजित केले असून महापालिकेचे जाहिरात धोरण लवकरच होणार आहे. नवी मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर व्यापारीकरण होत असून, होर्डींग्ज जास्त संख्येने उभारणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेता सदर होर्डींगमध्ये रक्कम रुपये १ कोटीची स्थायी समितीच्या माध्यमातून वाढ सुचवून ती रुपये ३६२ लाख अपेक्षित धरण्यात येत आहे.

## नवीन पूल बांधणे :-

नवी मुंबईत नवीन पूल बांधणे ही बाब आवश्यक आहे. नविन पूल बांधण्याकरीता एम.एम.आर.डी.ए. मार्फत कर्ज मिळणे आवश्यक आहे. नवी मुंबई शहरात वाहनांची वर्दळ ही मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. त्यासाठी पूल बांधणे हा उत्तम पर्याय असून त्यांची नितांत आवश्यकता आहे. नवी मुंबईत नविन पूल बांधणेकरीता रक्कम रुपये १० कोटी २० लाख अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येत आहे. व उर्वरित रक्कम एम.एम.आर.डी.ए. व सिडकोकडून मिळणेकरीता मा. आयुक्तांनी प्रयत्न करावेत.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक :-

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक हे अद्‌भूत, अलौकिक, आदर्श आणि दिशादर्शक बनविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करण्यात येईल. ही वास्तू वास्तुरचनेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून लोकांपुढे ठेवण्यात येईल. जेणेकरुन, त्याचे इतरत्र अनुकरण केले जाईल. अशा भव्यदिव्य वास्तुसाठी कितीही खर्च आला तरी त्यासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकामध्ये आयुक्तांनी रुपये १८ कोटीची तरतूद केलेली आहे. सदर तरतूदीमध्ये जो यापूर्वी मा. महासभेने डोमला मार्बल आच्छादन करणे हे काम सुचवून मंजूरी दिलेली आहे त्याचा समावेश त्यामध्ये केलेला नाही. याकरीता रक्कम रुपये ७ कोटीची त्यामध्ये स्थायी समितीच्या माध्यमातून वाढ सुचवून रुपये २५ कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे.

## प्रवेशव्दार गाव गावठाण (वाशी/ऐरोली/दिघा/शिळफाटा/बेलापूर) :-

यासाठी मागील वर्षीही पुरेशी तरतूद करण्यात आली होती. तथापि सन २०१७-२०१८ च्या अंदाजपत्रकामध्ये रुपये १ लाख तरतूद केलेली आहे. ही फार तुटपुंजी असून नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये २९ गावांचा समावेश झालेला आहे. येथील प्रकल्पग्रस्तांनी आपली १०० टक्के जमिन शासनाला दिली. त्यांना प्रशासन विसरलेले दिसतो. देशातील २५ टक्के वाहतूक या मुंबई-पुणे महामार्गावरुन होत असते. ठाणेमधील स्व. आनंद दिघे प्रवेशद्वार आहे त्याच धर्तीवर आपल्या नवी मुंबईत प्रवेशद्वार झाले पाहिजे. त्यामुळे नवी मुंबईची शान वाढेल, शहराची ओळख निर्माण होईल अशा प्रकारे वाशी, ऐरोली, दिघा, शिळफाटा, बेलापूर या मुख्य ठिकाणी प्रवेशद्वार झालेच पाहिजे. गावाच्या बाजूला शहरीकरण झालेले आहे. त्याठिकाणी मूळ गांव माहिती होत नाही. ही बाब लक्षात घेता महापालिका क्षेत्रातील गावांचे अस्तित्व स्पष्टपणे दिसावे याकीरता गावांना प्रवेशद्वार बनविण्यात यावे त्यासाठी रुपये ५ कोटी स्थायी समितीच्या माध्यमातून वाढ करण्यात

आली आहे.

## C.C.T.V. सर्व्हेलंस :-

नवी मुंबई क्षेत्रात सी.सी.टी.व्ही. सर्व्हेलन्स करीता प्रस्तावित अंदाजपत्रकामध्ये स्थायी समितीच्या माध्यमातून रुपये १२५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

## आदीवासींसाठी घरे बांधणे :-

सदर हेडमध्ये आदीवासींकरीता घरे बांधण्याकरीता स्थायी समितीच्या माध्यमातून रुपये २० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

## महापालिका शाळा इमारतींमध्ये Fire Exitnguisher लावणे :-

महापालिका शाळा इमारतींमध्ये फायर इस्टींगविशर (Fire Exitnguisher) लावणेकरीता स्थायी समितीच्या माध्यमातून रुपये ७ कोटी ३३ लक्ष ५२ हजार तरतूद करण्यात आली आहे.

## रस्ते, फुटपाथ, गटारे बांधणे (पी बजेट) :-

रस्ते, फुटपाथ, गटारे बांधणे या हेडमध्ये स्थायी समितीच्या माध्यमातून रुपये १० कोटी ३८ लाख तरतूद करण्यात आली आहे.

मा. आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावित अंदाजपत्रकातील पृष्ठ क्रमांक ३.५-अ, ३.६-अ, ३.७-अ, ४.१-अ वगळण्यात आले आहेत. तसेच अनुक्रमणिकेतील अनुक्रमांक ९ वरील प्रस्तावित कामांमधील "उपरोक्त सूची क्र. १ प्रमाणे रकाना क्र. १ मधील अनुक्रमांक १ ते ८२ मध्ये व रकाना क्र. २ व ३ मध्ये नमूद केलेल्या लेखाशिर्ष निहाय व रकाना क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या संख्येतील त्यासोबत जोडलेल्या अंदाजित कामांच्या रक्कमेसह स्थायी समितीच्या दिनांक २७ व २८ फेब्रुवारी, २०१७ आणि २ मार्च २०१७ रोजी बोलाविलेल्या अर्थसंकल्पीय विशेष सभेत झालेल्या चर्चेनुसार मा. आयुक्तांनी उत्पन्न आणि खर्चाच्या अंदाजामध्ये प्रस्तावित

केलेल्या कामांच्या यादीत मा. सभापती, स्थायी समिती यांचेकडे नवी मुंबई महानगरपालिकेच्या १११ पैकी ज्या सन्मा. सदस्यांनी आपापल्या प्रभागाशी संबंधित कामे सुचविली आहेत अशा कामांचा देखील ६०३ कामांच्या यादीत समावेश आहे ही सर्व कामे व उर्वरित त्यामधील शहरीकरणासाठी असलेली कामे प्रभागनिहाय करुन त्या कामांचे प्रस्ताव मा. स्थायी समिती व सर्वसाधारण सभेपुढे प्रशासकीय मान्यतेसाठी वेळोवेळी प्रस्ताव सादर करावेत असे प्रशासनाला आदेशित करीत आहे.

मा. आयुक्त यांनी सादर केलेला सन २०१६-२०१७ चा सुधारीत अर्थसंकल्प "अ", "क" आणि "पी" उपरोक्त सुधारणेसह स्थायी समितीने तयार केला असून, आरंभीची शिल्लक रुपये २९१ कोटी १० लाख २७ हजार जमेसह, एकूण रुपये २२९५ कोटी १९ लाख १७ हजार इतकी सुधारित जमा (महसुली आणि भांडवली) आणि सुधारित खर्च (महसुली आणि भांडवली) एकूण रुपये १९३९ कोटी ५३ लाख ५२ हजार इतका व शिल्लक रुपये ३५५ कोटी ६५ लाख ६५ हजार इतका अपेक्षित केला आहे. त्याचप्रमाणे मा. आयुक्त नवी मुंबई महानगरपालिका यांनी सादर केलेला सन २०१७-२०१८ मूळ अंदाजपत्रक "अ", "क" आणि "पी" उपरोक्त सुधारणेसह स्थायी समितीने सुधारणेसह मंजूर केले आहे. आरंभीची शिल्लक रुपये ३५५ कोटी ६५ लाख ६५ हजार जमेस धरुन, मा. स्थायी समितीने सुचविलेल्या वाढ(+)/घट(-) सह एकूण जमा (महसुली व भांडवली) रुपये २९३४ कोटी २९ लाख ९० हजार आणि एकूण खर्च (महसुली, भांडवली, इतर प्रकल्प जे.एन.एन.यु.आर.एम. व एम.एम.आर.डी.ए. सह) रुपये २९३३ कोटी ३० लाख ९० हजार इतका अपेक्षित करण्यात येत आहे. तसेच वर्षाअखेर रुपये ९९ लाख इतकी रक्कम शिल्लक अंदाजित करण्यात येत आहे. वरीलप्रमाणे नवी मुंबई महानगरपालिकेचा सन २०१६-१७ चा सुधारित रुपये २२९५.१९ कोटी जमा, रुपये १९३९.५३ कोटी खर्च व रुपये ३५५.६५ कोटी शिलकेसह तसेच सन २०१७-१८ चा मूळ रुपये २९३४.२९ कोटी जमा, रुपये २९३३.३० कोटी खर्च व रुपये ९९ लक्ष शिल्लकीचा अर्थसंकल्पीय अंदाज मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यात येत आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेचा हा अर्थसंकल्प मा. पक्षप्रमुख श्री. उध्दवजी ठाकरे साहेब यांच्या आशिर्वादाने सादर करताना हा अर्थसंकल्प लोकहिताय ध्येय-धोरणांनुसार असून तो वास्तववादी आहे हे सांगताना मला अतिशय आनंद होत आहे. या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून ज्या विविध संकल्पना सादर केलेल्या आहेत यांना मूर्त स्वरुप आणण्यासाठी ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. एकनाथजी शिंदे साहेब, महानगरपालिकेचे महापौर मा. श्री. सुधाकरजी सोनवणे साहेब, खासदार, मा. श्री. राजनजी विचारे साहेब, उपमहापौर, मा. श्री. अविनाशजी लाड साहेब, आणि माझे मार्गदर्शक श्री. विजयजी नाहटासाहेब, मा. श्री. जयवंतजी सुतार साहेब, सभागृहनेते, तसेच शिवसेना पक्षाचे गटनेते श्री. द्वारकानाथजी भोईर साहेब या सर्वांचे सहकार्य मला लाभले आहे. त्याचप्रमाणे माझ्या सर्व सहकारी सदस्यांचे तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महापालिका सचिव आणि सर्व विभागातील अधिकारी-कर्मचारी वर्गाचे, विविध वृत्तपत्र व वृत्तचित्रवाहिन्यांचे प्रतिनिधी यांचेही वेळोवेळी सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

मा. महापौर महोदय, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ९६ नुसार स्थायी समितीने सर्वंकष विचार करुन तयार केलेला सन २०१६-२०१७ चा सुधारित आणि सन २०१७-२०१८ चा मूळ अर्थसंकल्पीय अंदाज "अ", "क" आणि "पी" तसेच परिवहन उपक्रमाचा सन २०१६-२०१७ चा सुधारित आणि सन २०१७-२०१८ चा मूळ अर्थसंकल्पीय अंदाज "ब", तसेच वृक्षप्राधिकरणाचा सन २०१६-२०१७ चा सुधारित आणि सन २०१७-२०१८ चा मूळ अर्थसंकल्पीय अंदाज अंतिम स्विकृतीसाठी महानगरपालिकेपुढे सादर करण्यात येत आहे.

जय हिंद - जय महाराष्ट्र!

शिवराम परशुराम पाटील
सभापती, स्थायी समिती
नवी मुबई महानगरपालिका